पुढारी संमिश्र कोल्हापूर, रविवार, २९ जून २०२५

# अकरावीची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया एक, गोंधळ अनेक

## शिक्षण विभागाचा अनागोंदी कारभार; वेळापत्रकात वारंवार बदल



### दहावीचा निकाल वेळेत लागूनही प्रवेश प्रक्रिया रखडली

- विद्यार्थी-पालकांचा उद्‌बोधन वर्ग न घेता प्रवेश प्रक्रिया राबवण्यात आली
- शहरी, ग्रामीण विद्यार्थी-पालकांना ऑनलाईन प्रवेश फॉर्ममधील मुद्द्यांची कसलीही कल्पना नाही
- विद्यार्थ्यांनी त्या-त्या प्रवर्गातील हमीपत्र जोडले असून, मूळ प्रमाणपत्र दाखल केल्यावर समस्या निर्माण होणार
- अकरावीचे वर्ग १ जुलै रोजी सुरू होण्याची शक्यता मावळली

> शासनाने दहावीचा निकाल लवकर लावला. तरीदेखील अकरावीचे वर्ग १५ जुलैपूर्वी सुरू होण्याची शक्यता नाही. कारण, प्रवेश प्रक्रियेमधील गोंधळ आजअखेर संपलेला नाही. राज्य सरकारने शिक्षण विभागाच्या कारभारात गांभीर्याने लक्ष घालून प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी ही अपेक्षा.
>
> - डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य, विवेकानंद महाविद्यालय

### विद्यार्थ्यांना ५ विषयांत १७५ गुण आवश्यक

दहावी परीक्षेतील बेस्ट ऑफ फाईव्हच्या निकषानुसार ५ विषयांत १७५ पेक्षा कमी गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतून वगळण्यात आले आहे. त्यांना पुरवणी परीक्षा देऊनच १७५ पेक्षा जास्त गुण मिळवावे लागणार आहेत. त्यानंतरच सुरू असलेल्या फेरीत प्रवेशासाठी त्यांना सहभागी होणे शक्य होणार आहे.

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

राज्यभरात यावर्षी वाजतगाजत सुरू केलेल्या अकरावी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचा पुरता बोजवारा उडाला आहे. वारंवार वेळापत्रकात होत असलेल्या बदलांमुळे विद्यार्थ्यांसह पालक हैराण झाले आहेत. याला राज्याच्या शिक्षण विभागाचा अनागोंदी कारभार जबाबदार असल्याचे विद्यार्थी, पालकांमधून बोलले जात आहे. अकरावीची राज्यात प्रवेश प्रक्रिया एक अन् गोंधळ अनेक, अशी अवस्था आहे.

यावर्षी प्रथमच राज्यस्तरावरून एकच अकरावीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. कोल्हापूर जिल्ह्यात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेसाठी जिल्ह्यातील २८५ कनिष्ठ महाविद्यालयांतील ६६ हजार १० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीसाठी ४१ हजार ८९९ ऑनलाईन नोंदणी झाली. २६ जून रोजी सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर होणार होती. प्रत्यक्षात त्या दिवशी रात्री उशिरापर्यंत गुणवत्ता यादी जाहीर झाली नाही. अल्पसंख्याक समुदायाच्या शाळा, महाविद्यालयांतील प्रवेश क्षमता फेरबदल करणे अपेक्षित आहे.

काही न्यायालयीन प्रकरणे व तांत्रिक बाबींमुळे २६ जून रोजी सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करता येणार नसल्याचे परिपत्रक राज्याचे शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी काढले. मात्र, यातही आता बदल करण्यात आला. अचानकपणे शनिवारी सायंकाळी सुधारित अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली.

प्रवेश प्रक्रिया नेमकी किती दिवस चालेल व किती दिवसांत पूर्ण होणार, याची माहिती कोणीही सांगू शकत नाही. त्यामुळे प्रवेशाच्या अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाल्याने विद्यार्थी इतर अभ्यासक्रमांकडे वळले आहेत.

पुढारी | रविवार,
२९ जून २०२५

# तरुणपिढीला कामात गुंतवून प्रोत्साहन द्या : पालकमंत्री

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

एकीकडे शिक्षण जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच दुसऱ्या बाजूला एका विशिष्ट तरुण वयात रोजगार महत्त्वाचा आहे. तरुणांना कामात गुंतवून त्यांना भविष्यात तयार करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

मुख्यमंत्री प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत जिल्हा कौशल्य विकास विभाग व विवेकानंद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे प्राचार्य अभयकुमार साळुंखे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी उमेश देशमुख, गोकुळ एमआयडीसीचे अध्यक्ष स्वरूप कदम, स्वामी विवेकानंद संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे उपस्थित होते.



**कोल्हापूर : जिल्हा कौशल्य विकास विभाग व विवेकानंद संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर. समवेत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, उमेश देशमुख, स्वरूप कदम, कौस्तुभ गावडे आदी.**

पालकमंत्री अबिटकर म्हणाले, कौशल्य विभागाने औद्योगिक विकास महामंडळाच्या मदतीने आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्यातील संधीचा जास्तीत जास्त युवकांनी उपयोग करावा. २८ उद्योजकांनी १४७० रिक्त पदांसाठी मेळाव्यात आलेल्या हजारो तरुणांसाठी महत्त्वाची संधी होती. त्यांच्यासाठी आवश्यक मनुष्यबळ नक्कीच मिळेल. प्रास्ताविकात जमीर करीम यांनी रोजगार मेळाव्याबाबत माहिती दिली. मेळाव्यात ६३६ उमेदवार होते. पात्रतेनुसार ३६० मुलाखती घेण्यात आल्या, त्यापैकी प्राथमिक निवड २४७ तर ४३ जणांची अंतिम निवड झाली.